# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २६.०४.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २५.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १८ केसेसमध्ये २० ईसमावर कारवाई करून एकुण ६,६५,८७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,४१० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८९,९५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडीचा प्रयत्न करणारे आरोपींना अटक.**

पोलीस ठाणे कोराडी हद्दीत वॉक्स कुलरचे मागे, बडवाईक इंजिनिअरिंग कंपनीजवळ राहणारे फिर्यादी शेख मुश्ताक शेख रसूल मंसुरी वय ४५ वर्षे यांचा बडवाईक इंजिनिअरिंग कंपनीजवळ जिलानी पान पॅलेस सेंटर नावाचे दुकान आहे. दिनांक २४.०४.२०२६ चे २३.०० वा. ते २५.०४.२०२६ चे ०१.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादी हे दुकान बंद करून घरी गेले असता, त्यांचे ओळखीचे ईसमाने त्यांना फोन करून माहिती दिली की, काही चोर त्यांचा पान ठेला फोडून चोरी करीत आहे. अशा माहितीवरून फिर्यादी हे पान ठेल्याजवळ गेले असता, लोकांनी सांगितले की ॲक्सीस मोपेड वरून आलेले तीन चोर लोकांना पाहुन गाडी सोडुन पळून गेले आहेत. पान ठेल्याजवळ आरोपींची गाडी उभी असल्याचे दिसून आले. फिर्यादीने पोलीसांना कळविले असता, पोलीसांनी परिसरात तात्काळ शोध घेवून आरोपी क्र. ०१) शेख मुश्ताक शेख गुलजार वय १९ वर्षे रा. कामगार नगर म्हाडा कोलोनी, क्वॉर्टर नं. २९९, कपिलनगर, नागपूर २)शेख सलीम उर्फ मोनू वल्द शेख चांद वय १९ वर्षे, रा. वनदेवी नगर झोपडपट्टी, नागपूर व ३) बाबू उर्फ दिपक प्रकाश दुतखोर वय ५९ वर्षे रा. वनदेवी नगर, नागपूर यांना ताब्यात घेतले. आरोपींचे ताब्यातून गुन्हयात वापरलेली ॲक्सीस मोपेड गाडी क्र. एम.एच ३१ जी.बी. ३४३२ जप्त केली आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. तुषार नवले ९७६४८७०८०३ यांनी आरोपीविरूध्द कलम ३३४(१),३०५,६२,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे अंबाझरी :— आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०४.२०२६ रोजी फिर्यादीचा लहान भाऊ नामे शिलरत्न भिमराव बेलेकर, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. १०४, कृष्णनिर्सग अपार्टमेन्ट, इसासनी, नागपूर यांनी अंबाझरी तलावात उडी घेवून आत्महत्या केली होती. याप्रकरणी पोलीस ठाणे अंबाझरी येथे अकस्मात मृत्युची नोंद करण्यात येवून चौकशी सुरू होती. दिनांक ०५.०२.२०२४ ते दिनांक २४.०२.२०२६ चे दरम्यान, यातील मृतकाची पत्नी नामे रूचिका वय ३२ वर्षे हिचे मेश्राम नावाचे शिक्षकासोबत प्रेमसंबंध असल्याचे कारणावरून तिने मृतक यास मला तुझे सोबत राहायचे नाही. तु मला तुझी प्रापर्टी, पैसा दे व सोडचिट्टी दे. तु सुसाईड कर, तु मरून जा असे नेहमी म्हणून त्रास देत असल्याने मृतकाने आरोपी पत्नीचे त्रासाला व जाचाला कंटाळुन दिनांक २२.०४.२०२६ रोजी अंबाझरी तलावात उडी घेवून आत्महत्या केली. आरोपीने मृतकास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अकस्मात मृत्युचे चौकशी अंती पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. अविनाश निकाळजे ८८८८०५६८५० यांनी आरोपी विरूध्द कलम १०८ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— चोरी करणारे आरोपी विरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २४.०४.२०२६ चे १८.१० वा. ते १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. ६०, अध्यापक नगर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. साधना भिमराव बालपांडे वय ५८ वर्षे ह्या पांढर्णा गावावरून रेल्वेने परत आल्यावर संत्राा मार्केट गेट येथे उतरून घरी जाण्याकरीता ऑटोरिक्षाने घरी जात असतांना बैद्यनाथ चौकातून दोन अनोळखी महिला ऑटोत बसल्या नमुद अनोळखी महिलांनी फिर्यादीची नजर चुकवून फिर्यादीच्या हॅन्ड बॅगमधील छोटी पर्स ज्यामध्ये रोख १२,०००/—रू. व सोन्याचे वापरते वेगवेगळे दागीने असा एकुण ७,२२,०००/—रू. मुद्देमाल असलेली छोटी पर्स चोरून नेली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सपोनि. अश्वीन खेडीकर ९५५२३७११५५ यांनी दोन अनोळखी महिला आरोपीविरूध्द कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**